संदर्भ क्र. विविमं/२०२३–२४/३२ दिनांक : १०/०८/२०२३

प्रति,
मा. प्राचार्य/संचालक/विभागप्रमुख
सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाशी संलग्नित
सर्व महाविद्यालये व मान्यताप्राप्त परिसंस्था,
विद्यापीठ परिसरातील संबंधित शैक्षणिक विभाग, पुणे.

**विषय : ''महाराष्ट्र स्टुडंट इनोव्हेशन चॅलेंज'' उपक्रमाच्या प्रभावी अंमलबजावणी बाबत..**

**संदर्भ : उशिसं/मवि–१/संकीर्ण/२०२३/८९०१ दिनांक ०७ ऑगस्ट, २०२३ चे प्रत.**

महोदय/महोदया,

उपरोक्त संदभीर्य पत्रास अनुसरून आपणास कळविण्यात येते कि, राज्यातील नाविन्यपूर्ण संकल्पना आणि प्रोत्साहन देण्यासाठी कौशल्य, रोजगार, उद्योजकता व नाविण्यता विभागांतर्गत **''महाराष्ट्र राज्य नाविण्यपूर्ण स्टार्टअप धोरण''** जाहीर करण्यात आले आहे. सदर धोरणाच्या प्रभावी अंमलबजावणीसाठी महाराष्ट्र राज्य नाविण्यता सोसायटी ही नोडल एजन्सी म्हणून कार्यरत आहे. या धोरणाच्या माध्यमातून राज्यामध्ये स्टार्टअप परिसंस्था बळकट करण्याकरिता, इनक्युबेर्टसी स्थापना व विस्तार, गुणवत्ता परीक्षण व बौध्दिक संपदा हक्कासाठी अर्थसहाय्य, ग्रॅड चॅलेंज, स्टार्टअप वीक यासारख्या अनेक कार्यक्रमाचे आयोजन करण्यात येते.

राज्यातील विद्यार्थ्यांच्या नवसंकल्पनांना मूर्त स्वरूप देण्यासाठी महाराष्ट्र राज्य नाविन्यता सोसायटीमार्फत महाराष्ट्र स्टूडंट इनोव्हेशन चॅलेंजचे आयोजन करण्यात आले आहे. राज्यातील महाविद्यालयीन विद्यार्थ्यांच्या नवसंकल्पनांचा शोध घेणे व त्यांचे नवउद्याजकतेचे स्वप्न साकार करण्यासाठी योग्य ते पाठबळ पुरविणे हे या उपक्रमाचे मुख्य उद्दिष्ट आहे.

सदर उपक्रमाचे अनावरण दि. १५ जुलै २०२३ मा. मंत्री, कौशल्य, रोजगार, उद्योजकता आणि नाविन्यता – महाराष्ट्र राज्य यांच्या हस्ते करण्यात आले आहे. महाराष्ट्र स्टूडंट इनोव्हेशन चॅलेंजबाबत नोंदणी प्रक्रिया व अधिक माहिती महाराष्ट्र राज्य नाविन्यता सोसायटीच्या www.msins.in व http://schemes.msins.in या अधिकृत संकेतस्थळावर उपलब्ध आहे.

या संबंधीचे सविस्तर पत्र आपल्या माहितीसाठी व उचित कार्यवाही साठी सोबत जोडले आहे. आपल्या महाविद्यालय/ परिसंस्था / विभागातील मुख्य सूचना फलकावर सदर पत्र प्रदर्शित करुन विद्यार्थ्यांच्या निदर्शनास आणून देण्याबाबत संबंधितास सूचित करावे, कळावे हि विनंती.

सोबत : वरीलप्रमाणे

(डॉ. अभिजीत कुलकर्णी)
संचालक,(अतिरिक्त कार्यभार)
विद्यार्थी विकास मंडळ

महाराष्ट्र शासन
शिक्षण संचालनालय, (उच्च शिक्षण),
महाराष्ट्र राज्य, मध्यवर्ती इमारत, पुणे-४११ ००१.

Web : www.dhepune .gov. in E-Mail :mavi. dhepune@gov.in

फोन नं.020/26122119,26051512,26130627,26124639 फॅक्स नं. 020/26111153.

क्र.: उशिसं/मवि-१/संकीर्ण/२०२३/ ८२०९ दिनांक: .८.२०२३

07 AUG 2023

प्रति,

१. सर्व विभागीय सहसंचालक, उच्च शिक्षण, महाराष्ट्र राज्य.

२. कुलसचिव, सर्व अकृषी विद्यापीठे /अभिमत विद्यापीठे/
स्वयंअर्थसहाय्यित विद्यापीठे- महाराष्ट्र राज्य.

**विषय: "महाराष्ट्र स्टुडंट इनोव्हेशन चॅलेंज" उपक्रमाच्या प्रभावी अंमलबजावणी बाबत..**

संदर्भ: शासनपत्र क्र. मनासो २०२३/प्र.क्र.११८/कौशल्य-२ दि. २६.७.२०२३

राज्यातील नाविन्यपूर्ण संकल्पना आणि नवउद्योगांना प्रोत्साहन देण्यासाठी कौशल्य, रोजगार, उद्योजकता व नाविन्यता विभागांतर्गत "महाराष्ट्र राज्य नाविन्यपूर्ण स्टार्टअप धोरण" जाहीर करण्यात आले आहे. सदर धोरणाच्या प्रभावी अंमलबजावणीसाठी 'महाराष्ट्र राज्य नाविन्यता सोसायटी' ही नोडल एजन्सी म्हणून कार्यरत आहे. या धोरणाच्या माध्यमातून राज्यामध्ये स्टार्टअप परिसंस्था बळकट करण्याकरिता, इनक्युबेटर्सची स्थापना व विस्तार, गुणवत्ता परीक्षण व बौध्दिक संपदा हक्कासाठी अर्थसहाय्य, ग्रँड चॅलेंज, स्टार्टअप वीक यासारख्या अनेक कार्यक्रमाचे आयोजन करण्यात येते.

**राज्यातील विद्यार्थ्यांच्या नवसंकल्पनांना मूर्त स्वरुप देण्यासाठी महाराष्ट्र राज्य नाविन्यता सोसायटीमार्फत महाराष्ट्र स्टूडंट इनोव्हेशन चॅलेंजचे आयोजन करण्यात येत आहे. राज्यातील महाविद्यालयीन विद्यार्थ्यांच्या नवसंकल्पनांचा शोध घेणे व त्यांचे नवउद्योजकतेचे स्वप्न साकार करण्यासाठी योग्य ते पाठबळ पुरविणे हे या उपक्रमाचे मुख्य उद्दिष्ट आहे.**

सदर उपक्रमाचे अनावरण दि. १५ जुलै २०२३ रोजी मा. मंत्री, कौशल्य, रोजगार, उद्योजगता आणि नाविन्यता - महाराष्ट्र राज्य यांच्या हस्ते करण्यात आले असून राज्यातील सर्व शैक्षणिक संस्थांना सदर उपक्रमामध्ये सहभागी होता येणार आहे.

| | |
|---|---|
| **पहिला टप्पा -** | |
| शैक्षणिक संस्थांची नोंदणी | १५ जुलै - १५ ऑगस्ट, २०२३ |
| विद्यार्थ्यांकडून अर्जासाठी मागणी | १ ऑगस्ट - ३१ ऑगस्ट, २०२३ |
| संस्था स्तरावर सादरीकरण सत्र | १० सप्टेंबर - २० सप्टेंबर, २०२३ |
| संस्थानिहाय सर्वोत्कृष्ट नवसंकल्पनांची घोषणा | २३ सप्टेंबर, २०२३ |
| **दुसरा टप्पा -** | |
| जिल्हास्तरीय १०० सर्वोत्कृष्ट नवसंकल्पनांची घोषणा | २५ सप्टेंबर, २०२३ |
| प्रशिक्षण सत्र | २७ सप्टेंबर - ५ ऑक्टोंबर, २०२३ |
| जिल्हा स्तरावर सादरीकरण सत्राचे आयोजन | ६ ऑक्टोंबर - १५ ऑक्टोंबर, २०२३ |
| प्रत्येक जिल्हयातून १० विजेत्यांची घोषणा | १८ ऑक्टोंबर, २०२३ |

| तिसरा टप्पा - | |
|---|---|
| इनक्युबेशन सहाय्यासाठी मॅपिंग करुन इनक्युबेशन प्रोग्रामला सुरुवात | १२ महिन्यांसाठी इनक्युबेशन सहाय्य |
| इनक्युबेशन प्रोग्राम | |
| राज्यस्तरावर सादरीकरण सत्र आणि विजेत्यांची घोषणा | |

महाराष्ट्र स्टुडंट इनोव्हेशन चॅलेंजबाबत नोंदणी प्रक्रिया व अधिक माहिती महाराष्ट्र राज्य नाविन्यता सोसायटीच्या www.msins.in व http://schemes.msins.in याअधिकृत संकेतस्थळावर उपलब्ध आहे.

आपणास कळविण्यात येते की, आपल्या कार्यकक्षेतील सर्व अकृषी/अभिमत/स्वयंअर्थसहाय्यित विद्यापीठे तसेच शासकीय/ अशासकीय अनुदानित/ विनाअनुदानित/ कायम विना अनुदानित/ मॉडेल डिग्री महाविद्यालये यांना या उपक्रमाबाबत अवगत करण्यात यावे.

विषयांकित उपक्रमामध्ये जास्तीत जास्त विद्यार्थ्यांनी नोंदणी करुन सदर उपक्रमाचा लाभ घ्यावा यासाठी विद्यार्थ्यांना प्रोत्साहन देण्याबाबत संबंधितांना सूचना देण्यात याव्यात. सदर उपक्रमाबाबत जास्तीत जास्त संस्थांनी सहभाग नोंदविणे आवश्यक आहे. आपल्या स्तरावरुन, शैक्षणिक संस्थांच्या सहभागाबाबतचा आढावा घेऊन त्याबाबतचा अहवाल संचालनालयास सादर करण्यात यावा.

(डॉ. शैलेंद्र देवळाणकर)
शिक्षण संचालक (उच्च शिक्षण)
महाराष्ट्र राज्य, पुणे -१.

प्रत माहितीस्तव - मा. प्रधान सचिव, उच्च व तंत्र शिक्षण विभाग, मंत्रालय, मुंबई - ४०००३२.